महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील
अधिकाऱ्यांच्या बदल्या / नियुक्त्या.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन आदेश क्र. मविसे-१०१७/प्र.क्र.२००/२०१७/आस्था-३

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.
तारीख: २२ नोव्हेंबर, २०१७.

शासन आदेश-

सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने आणि उक्त अधिनियमाच्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वमान्यतेने ग्राम विकास विभागातील श्री.आर.एस. कणसे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती मौदा, जि.नागपूर यांची गट विकास अधिकारी, पंचायत समिती कवठेमहांकाळ, जि.सांगली या पदावर (दि.३०.११.२०१७ रोजी श्री.एस.एस. माने यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणाऱ्या पदावर) बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

२. श्री.आर.एस. कणसे यांनी दिनांक ३०.११.२०१७ नंतर त्यांच्या नवीन पदाचा पदभार स्वीकारावा व पदभार स्वीकारल्याचा दिनांक शासनास कळवावा. तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : सीडीआर १०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नागपूर यांनी श्री.कणसे यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून दिनांक ३०.११.२०१७ नंतर कार्यमुक्त करावे व त्यांच्या नियुक्तीच्या जागी रुजू होण्यास सांगावे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२२१५४८०७०३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ananda Shankar Shendage

Digitally signed by Ananda Shankar Shendage
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0db7067f83b51744741b4485650edc8705560188be635df819605b4913ead056, cn=Ananda Shankar Shendage
Date: 2017.11.22 16:59:49 +05'30'

(आ.शं. शेंडगे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
३) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
४) मा. सचिव (ग्राम विकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक,
५) विभागीय आयुक्त, पुणे /नागपूर.
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली / नागपूर,
७) जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली / नागपूर.
८) महालेखापाल- १/२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
९) श्री.आर.एस. कणसे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती मौदा, जि.नागपूर (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेमार्फत)
१०) कार्यासन, आस्था-२, ग्राम विकास विभाग
११) निवड नस्ती (कार्यासन, आस्था-३), ग्राम विकास विभाग.